# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 29/10/2023 (रविवार) दुपार

---

### चोरी

**पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत मौजा उकरवाही शिवारात पिरमिन्ड ड्रीक्स प्रायव्हेट लिमीटेड कंपनी येथे दिनांक १२/१०/२०२३ चे २२.०० वा. ते दि. १३/१०/२०२३ चे सकाळी ०४.०० वा. चे सुमारास फिर्यादी नामे— चंन्द्रकांत किसन भुरे, वय ४५ वर्ष, रा. नरेन्द्र नगर प्लॉट नं. १५ अयप्पा मंदिराजवळ नागपुर यांनी उकरवाही शिवारात पिरमिन्ड ड्रीक्स प्रायव्हेट लिमीटेड कंपनी मध्ये मित्रासह पार्टनरशिप मध्ये मागील ४ वर्षापासून चालू केलेला आहे, यातील फिर्यादी यांचा मित्र पृथ्वीराज जगताप यांचे मालकीचा आयशर प्रो ३०१९ ट्रक क्र एम एच ४८/सी बी—५००१ हा ट्रक मौजा उकरवाही शिवारात पिरमिन्ड ड्रीक्स प्रायव्हेट लिमीटेड कंपनीचा आवारात उभा केला असता कोणीतरी अज्ञात चोराने कंपनीचे आत प्रवेश करून उभा ट्रकचे सात टायर डिक्स सहीत किंमती अंदाजे ७००००/—रू व एक्साईड बॅटरी किंमती ५०००/— रू तसेच फॉग लाईट किंमती अंदाजे १०००/— रू असा एकुण ७६०००/— रू मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा नरेंद्र पटले, पोस्टे उमरेड मो. नं. ९४२२८१२०८० करीत आहे.

### मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. भिवापूर** :— अंतर्गत आर्या बार जवळ देशी दारू भट्टीच्या जवळ भिवापुर येथे दिनांक २७/१०/२०२३ चे १६.०० वा. ते १७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— शिशुपाल नळाजी मेश्राम वय २९ वर्षे रा. कोलारी ता. भिवापुर जि. नागपुर यांची मोटरसायकल हीरो कंपनीची स्पेलंडर प्रो निळसर रंगाची एम. एच. —४०/ए. ए— २१४१ किंमती २०,०००/— रू. घटनास्थळावरून कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापूर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा धात्रक हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर